RNI NO : MAHMAR/2022/84546

Postal No : BLD/228/2023-25

साप्ताहिक

# पब्लिक कॉन्टॅक्ट

9422180819 publiccontact2022@gmail.com PUBLIC CONTACT | मुख्य संपादक : गजानन राऊत | कार्यकारी संपादक : श्याम राऊत

| वर्ष ५ वे | अंक १८६ वा | गुरुवार दि. २७ नोव्हेंबर २०२५ ते ३ डिसेंबर २०२५ | किंमत ५ रुपये | पृष्ठे ८

# प्रभाग ०४ च्या प्रभावी उमेदवार सुलोचना सिरसाट यांचा बोलबाला

## सुलोचनाताई सिरसाट यांना प्रचंड मतांनी विजयी करा : शरद वसतकार

**खामगाव** : वंचित बहुजन आघाडी कडून प्रभाग क्रमांक 03 मध्ये उच्च शिक्षित सुलोचना सिरसाट यांच्या रूपात उमेदवार दिला आहे त्यामुळे आता प्रभाग 03 च्या विकासाला चालना मिळणार आहे.

सुलोचना सुरेश सिरसाट यांना निवडून आणण्यासाठी वंचित बहुजन आघाडी चे नेते शरद वसतकार यांनी प्रभाग 03 मध्ये प्रचार रॅली काढली प्रत्येक मतदारांपर्यंत जाऊन सुलोचना सिरसाट यांना विजयी करून वंचित बहुजन आघाडी चे हात आणखी मजबूत करा असे आवाहन केले सर्व





धर्म समभाव असलेल्या उमेदवार सुलोचना सिरसाट यांना प्रभागातून वाढता प्रतिसाद मिळत असून मतदारांनी सुलोचना सिरसाट यांना निवडून आणण्याचा शब्द यावेळी दिला आहे.

जातीयवाद भडकवणाऱ्या आणि जातीजातीत भांडणे लावणाऱ्याला त्याची जागा दाखवा आणि सर्वांना सोबत घेऊन चालणाऱ्या उमेदवार सुलोचना सिरसाट यांना भरघोस मतांनी विजयी करा असे आवाहन वंचित बहुजन आघाडी चे नेते शरद वसतकार यांनी केले आहे त्याच्या आवाहनाला मतदारांनी ही प्रतिसाद दिला आहे.

# खामगाव डेंटिस्ट असोसिएशनचा भाजप उमेदवारांना जाहीर पाठिंबा

## नगराध्यक्ष पदासाठी सौ.अपर्णा सागर फुंडकर यांना ठाम समर्थन

**खामगाव** : डिसेंबर रोजी होणाऱ्या नगरपरिषद निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर खामगाव डेंटिस्ट असोसिएशनने भारतीय जनता पक्षाच्या सर्व अधिकृत उमेदवारांना तसेच नगराध्यक्ष पदाच्या अधिकृत उमेदवार सौ. अपर्णा सागर फुंडकर यांना बिनशर्त जाहीर पाठिंबा दिला आहे.

असोसिएशनने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शहरातील नागरिकांच्या आरोग्यविषयक समस्या, भयमुक्त आणि आजारमुक्त खामगाव घडवण्याच्या अपेक्षेने हा पाठिंबा दिला जात आहे. आगामी कार्यकाळात



शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आणि निरोगी वातावरण निर्मितीसाठी भाजपचे उमेदवार सक्षमपणे काम करतील, असा विश्वास असोसिएशनने व्यक्त केला आहे. "नगराध्यक्ष पदाच्या अधिकृत उमेदवार सौ. अपर्णा सागर फुंडकर आणि त्यांच्या टीमवर आम्ही पूर्ण विश्वास ठेवतो.

नागरिकांची मनोकामना पूर्ण करणारे निर्णय आणि कामे ते करणार याची खात्री असल्याने आम्ही सर्व उमेदवारांना जाहीर पाठिंबा देत आहोत," असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या निवेदनावर शहरातील डेंटिस्ट असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांच्या सह्या आहेत. भारतीय जनता पक्षाच्या वतीने भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष चंद्रशेखर पुरोहित, सतीशआप्पा दुडे, हनुमान टावरी, ॲड. बाबू भट्टड यांनी हे पाठिंब्याचे पत्र स्विकारले.



**खामगाव :** नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदान प्रक्रिया पार पडली. यावेळी राज्याचे कामगार मंत्र ॲड. आकाश फुंडकर यांनी सर्व परिवारासमवेत मतदान केंद्रावर जावून मतदान केले.




**खामगाव :** नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदान प्रक्रिया पार पडली. यावेळी मतदानाचा हक्क बजावताना खामगाव मतदार संघाचे माजी आमदार दिलीपकुमार सानंदा.



# नकली दातांच्या डॉक्टरांपासून नागरिकांनी सावध राहणे गरजेचे

## महाराष्ट्र राज्य इंडियन डेंटल असोसिएशनचे व माजी उपाध्यक्ष डॉ.गोविंद अग्रवाल यांचे आवाहन

**खामगाव** : गेल्या काही दिवसापासून दातांचे नकली डॉक्टर घरोघरी जाऊन उपचार करत असल्याचे निदर्शनास आले आहे. या बोगस डॉक्टरांकडून दातावर योग्य उपचार होत नाही. परिणामी रुग्णांना उपचारानंतर दातांमध्ये पस तयार होणे तसेच कॅन्सरची ही लक्षणे दिसत आहेत. बोगस डॉक्टरांकडून उपचार घेत असल्याने रुग्णांना त्रास होत आहे. त्यामुळे अशा बोगस दातांच्या डॉक्टरांकडून रुग्णांनी वेळीच सावध होणे गरजेचे आहे असे आवाहन दंतरोग तज्ञ डॉक्टर गोविंद अग्रवाल यांनी केले.




शेगाव रोडवरील हॉटेल प्राइड येथे रविवारी सायंकाळी महाराष्ट्र राज्य इंडियन डेंटल असोसिएशनच्या वतीने पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते यावेळी. असोसिएशनचे शाखा खामगाव अध्यक्ष डॉ. विष्णू गोपाल चौधरी, सचिव डॉ.अंकुश केडिया, राज्य कार्यकारिणी सदस्य डॉ.दीपक उधाणी, डॉ.अमोल कुकडे, डॉ. परमेश्वर चव्हाण, डॉ. रोहित चरखे, डॉ. आशिष गवई यांच्यासह संघटनेचे सदस्य उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ. गोविंद अग्रवाल यांनी सांगितले की, दातांचा दवाखाना करणे रुग्णांना महागडे वाटत असले तरी दातावर उपचार करण्यासाठी आता नवनवीन यंत्रसामुग्री आलेली आहे. रुग्णांच्या दातावर योग्य उपचार करण्यासाठी सरकारमान्य अधिकृत डॉक्टरांकडूनच उपचार केले पाहिजेत जेणेकरून रुग्णांना उपचारानंतर त्रास होणार नाही.

मात्र, जिल्हाभरात गेल्या काही दिवसापासून दातांचे नकली डॉक्टर गावागावात व घरोघरी बॅग घेऊन फिरत असल्याचे दिसून आले आहे. हे डॉक्टर रुग्णांना भूलथापा देऊन कमी पैशात उपचार होते असे सांगतात. तर त्यांच्या या उपचाराच्या आमिषाला नागरिकही बळी पडत आहेत.मात्र दातावर उपचार केल्यानंतर अनेक रुग्णांना त्रास होत आहे त्रास झाल्यानंतर हे रुग्ण आमच्याकडे येतात त्यावेळी त्यांच्या दाताची तपासणी केली असता त्यामध्ये पस तयार होण्याचे प्रमाण वाढलेले आहे तसेच काही रुग्णांमध्ये कॅन्सरही झाल्याचे दिसून आले आहे.

याबाबत रुग्णांना आपण अशा नकली डॉक्टरांपासून उपचार करू नये असे वारंवार सांगितले जाते. रुग्णांना दुसरा दात बसविण्यासाठी यंत्रसामुग्रीचा उपयोग केला जाते मात्र या नकली डॉक्टराद्वारे कोणतीही यंत्रसामुग्री न वापरता ते ॲक्रिलिकद्वारे दात बसवत आहे. यामुळे दातांचा कॅन्सर होण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये जनजागृती व्हावी यासाठी महाराष्ट्र राज्य इंडियन डेंटल असोसिएशन चा प्रयत्न आहे. नकली डॉक्टरांना जवळून दातांचा उपचार करून घेऊ नये जेणेकरून रुग्णांना त्रास होईल. त्यामुळे सरकारमान्य डॉक्टरांकडूनच नागरिकांनी दातांचा उपचार करावा असे आवाहनही यावेळी करण्यात आले. संचालन डॉ. मयूर वानखेडे यांनी तर आभार डॉ. प्रसाद खराटे यांनी मानले.

# भटक्या श्वानांचे निर्बिजीकरण, लसीकरण होणार !

## सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश



**बुलडाणा, (जिमाका)** : शहरी व ग्रामीण भागातील भटक्या जनावरांमुळे मानवाच्या दैनंदिन जीवनात होणारा उपद्रव तसेच मानव-श्वान संघर्षाच्या गंभीर घटनांची दखल घेत जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी जिल्ह्यातील भटक्या श्वानांना पकडून त्यांचे निर्बिजीकरण, लसीकरण व जंतनिर्मुलन करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मानव-श्वान संघर्ष टाळण्यासाठी उपाययोजना करण्यासंदर्भात जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी त्यांच्या कार्यालयात जिल्हास्तरीय प्राणी क्लेष प्रतिबंध सोसायटीची बैठक गुरुवारी घेतली.

या बैठकीला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात, निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हळे, नगरविकासचे जिल्हा सह आयुक्त जी. एस. पेंटे, पशुसंवर्धन उप आयुक्त अमितकुमार दुबे, प्र. जिल्हा माहिती अधिकारी पवन राठोड, नगरपरिषदांचे मुख्याधिकारी (दूरदृष्यप्रणाली), पोलीस अधिकारी आदी उपस्थित होते.

या बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी आढावा घेवून नगरपरिषदेने शहरी भागातील भटक्या श्वानांना पकडण्यासाठी जाळ्याचे प्राणी वाहन, कॅचिंग नेट उपलब्ध करावे, पशुवैद्यकीय अधिकारी यांच्या मदतीने भटक्या श्वानांचे निर्बिजीकरण, लसीकरण व जंतनिर्मुलन करावे, त्यांना मारु नका, त्यांच्यासाठी आश्रय किंवा निवाऱ्याची सोय करावी, यासाठी चांगले काम करणाऱ्या गौशाळा, सेवाभावी संस्थांचे सहकार्य घ्यावे. भटक्या श्वानांसाठी खाऊ घालण्याच्या जागा निश्चित करावी, भटक्या जनावरांबाबत माहिती व तक्रारींसाठी हेल्पलाईन क्रमांक सुरु करावे. दि.७ नोव्हेंबर २०२५ रोजी झालेल्या सुनावणीअंती दिलेल्या अंतरिम निर्णयान्वये सर्वोच्च न्यायालयाने मानव-श्वान संघर्ष टाळण्यासाठी उपाययोजना करण्याचे निर्देश दिले होते. या निर्देशांच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी अधिकाऱ्यांची बैठक घेतली होती.

# भारतीय डाक विभागाची सेल्फ बुकींग व डोरस्टेप पिकअप सुविधा

**बुलडाणा, (जिमाका)** : भारतीय डाक विभागामार्फत नागरिकांसाठी आधुनिक, जलद व वापरण्यास सुलभ अशा सेल्फ बुकींग व डोरस्टेप पिकअप (Self-Booking & Doorstep Pickup Service) या सुविधा उपलब्ध करून देण्यात आले आहेत. या सेवेमुळे ग्राहकांना आता घरी किंवा कार्यालयात बसूनच स्पीड पोस्ट, रजिस्टर्ड, पार्सल इत्यादींचे ऑनलाईन बुकिंग करता येणार आहे. विशेष म्हणजे, बुकिंगनंतर डाक विभागाचे कर्मचारी थेट ग्राहकांच्या घरी येऊन पार्सलचे पिकअपही करतील.

ही सुविधा व्यवसायिक, व्यापारी, स्टार्टअप्स, कार्यालये तसेच सर्वसामान्य ग्राहकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार असून, अनावश्यक प्रवास टाळून वेळ आणि खर्च दोन्हीची बचत होणार आहे. सेल्फ बुकींग सुविधा वापरण्यासाठी ग्राहकांनी www. indiapost.gov.in किंवा India Post Mobile App वर जाऊन

भारतीय डाक
India Post

"Self Booking" हा पर्याय निवडून संबंधित माहिती भरावी. तर डोरस्टेप पिकअप सुविधेसाठी त्याच ॲप/वेबसाईटवरून पिकअप विनंती नोंदवता येते. निश्चित वेळेत डाक कर्मचारी पिकअपसाठी भेट देतात.

या दोन्ही सेवा पूर्णपणे सुरक्षित, पारदर्शक असून ट्रॅकिंगची सुविधा देखील उपलब्ध आहे.

ग्राहकांनी पाठवायचे साहित्य योग्य प्रकारे पॅक करून ठेवणे, प्रतिबंधित वस्तू टाळणे, तसेच पत्ता अचूक लिहिणे आवश्यक आहे, असे विभागाने स्पष्ट केले आहे. या आधुनिक सेवांचा अधिकाधिक नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन डाकघर अधीक्षक गणेश आंभोरे यांनी केले आहे.




"Printed by Sanjay Pralhad Vinke Published by Gajanan Kisanrao Raut on behalf of Gajanan Kisanrao Raut and Printed at Printwell Offset , Keshav Nagar, Ghatpuri Road, Khamgaon and published from At.Post,Sutala BK, Tq. Khamgaon, Dist. Buldana Editor Gajanan Kisanrao Raut

पब्लिक कॉन्टॅक्ट हे साप्ताहिक मालक, संपादक, प्रकाशक गजानन किसनराव राऊत यांनी संजय प्रल्हाद विणके, मुद्रक यांच्या प्रिंटवेल आफ सेट, केशव नगर, घाटपुरी रोड, खामगांव ४४४३०३ येथे छापून सा. पब्लीक कॉन्टॅक्ट कार्यालय, मु.पो. सुटाळा बु. ता. खामगांव, जि. बुलडाणा येथे प्रसिध्द केले. या अंकातील सर्व लेखांशी संपादक सहमत असेलच असे नाही.पी. आर. बी. कायद्यानुसार वाद खामगांव न्यायालया अंतर्गत. RNI NO: MAHMAR/2022/84546


विजयी करा..!
प्रभाग क्र. 11
विजयी करा..!
खामगांव नगर परिषद
सार्वत्रिक निवडणूक 2025
प्रभाग क्र. 11 अ चे अपक्ष उमेदवार
सौ. शारदा
आकाश लाहुडकार
यांच्या शिट्टी या निशाणी समोरील बटन दाबुन
प्रचंड बहुमतांनी विजयी करा..!
मतदान : मंगळवार दि. 2 डिसेंबर 2025
वेळ : सकाळी 7.30 ते सायं. 5.30 वा. पर्यंत
प्रकाशक - नरेंद्र गजानन फेरण
मुद्रक:- उन्हाळे ग्राफीक्स
नग - 100
विजयी करा..!
विजयी करा..!

# खामगाव नगर पालिकेसाठी ७० टक्के मतदान

## सकाळपासूनच मतदारांचा मतदानासाठी उत्साह : मतदान प्रक्रिया शांततेत पुर्ण

**खामगाव** : खामगाव नगर पालिका निवडणुकीत आज सर्वसामान्य मतदारांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत सुमारे ७० टक्के मतदान झाले. सकाळी मतदानाला सुरूवात होताच शहरातील मतदान केंद्रांवर मतदारांच्या रांगा दिसून आल्या. तरुणांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वच स्तरातून उत्साहपूर्ण प्रतिसाद मिळाला. दिवसभरात कोठेही अनुचित प्रकार घडला नसून मतदान प्रक्रिया पूर्णतः शांततेत पार पडली, अशी माहिती



निवडणूक विभागाकडून देण्यात आली. सकाळी ७ वाजता मतदानास सुरुवात होताच अनेक केंद्रांवर विशेषतः महिलांची उपस्थिती लक्षणीय दिसून आली. मतदान केंद्राबाहेर पोलीस बंदोबस्त तैनात असून सर्वत्र कडेकोट सुरक्षा व्यवस्था होती.

शहरातील १७ प्रभागांमधील ७९ मतदान केंद्रांवर ही निवडणूक प्रक्रिया राबविण्यात आली. मतदानाचा वेग सकाळ व दुपारी काहीसा मंदावला असला तरी संध्याकाळी मात्र मतदारांनी केंद्रांकडे मोठ्या संख्येने धाव घेतली. अनेक प्रथमच मतदान करणाऱ्या युवकांनी ही निवडणूक आपली लोकशाहीची पहिली जबाबदारी असल्याचे सांगितले. ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र रांगा, व्हीलचेअर, पिण्याच्या पाण्याची उत्तम व्यवस्था यामुळे मतदान सुरळीत झाले. शहरात दिवसभर शांतता होती. कोणत्याही पक्षाकडून आक्षेपार्ह प्रचार, गोंधळ अथवा वादाची नोंद झाली नाही. कोणत्याही केंद्रावर पुनर्मतदानाची गरज भासली नाही, हे विशेष.

दरम्यान आता सर्वांचे लक्ष मतमोजणीकडे लागले असून निवडणुकीचा निकाल कोणाच्या बाजूने झुकणार याची उत्सुकता वाढली आहे. खामगावकरांनी केलेल्या ६५ टक्के मतदानातून शहराच्या विकासासाठी कोणती नवी दिशा ठरते, याकडे सर्वांचे डोळे लागले आहे.



## 500 कोटीच्या कामातून विकास कोणाचा ? खामगांव शहराचा.... की सत्ताधाऱ्यांच्या खिश्याचा ?

# हे विसरू नका !



रेल्वेगेट चा अपूर्ण अंडरपास,



रस्त्यांची झालेली दूरावस्था



घाणीचे साम्राज्य

खामगांव नगरपालिकेत जनतेच्या मतांनी निवडून आलेले सत्ताधारी आम्ही ५०० कोटीचा विकास केला असे सांगुन आज पुन्हा तुमच्या दारात येऊन मते मेगत आहेत. परंतू खरा प्रश्न असा आहे की, हे ५०० कोटी खर्चले कुठे ? विकास झाला कोणाचा ? खामगांवचा ? की ठेकेदार-सत्ताधाऱ्यांच्या खास गटाचा ? कारण वास्तव जनतेला स्पष्ट दिसत आहे, ठिक-ठिकाणी तुंबलेल्या नाल्या, घाणीचे ढीग व डेंग्युचे डोंगर, खड्डेमय रस्ते, पावसाळ्यात चिखलाचे दलदल, अंधारात बुडालेले पथदिवे, कुलुप लागलेले सार्वजनिक शौचालय आणि सुरुवातीपासून निकृष्ट दर्जाची कामे. हेच ते शाश्वत विकासाचे पितळ!

आता निर्णय बदलण्याची व शहराच्या खऱ्या विकासासाठी मतदान करण्याची वेळ जवळ आली आहे. त्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते, राज्याचे उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री मा.ना.श्री. अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली पक्षाचे नगराध्यक्ष आणि नगरसेवक उमेदवार यांना आपण आशीर्वादरूपी मते देवुन विजयी करावे. खामगांव शहराझ्ये पारदर्शक कामे, मजबूत पायाभूत सुविधा, स्वच्छता, सुरक्षितता, सुयोग्य नियोजन आणि सर्व समावेशक विकास करण्याची आम्ही ग्वाही देतो. हा विकास खामगांवचा असे, कुणाच्यातरी खिशाचा नाही !

तुमच्या बहूमुल्य मतांनी निवडून येऊन शहरा ऐवजी स्वत:चा शाश्वत विकास करुन आपल्या मतांचा वापर स्वत:ची पॉवर वाढविणाऱ्यांना मत न देता या निवडणूकीत त्यांना पराभवाची धूळ चारा, त्यांना पुन्हा स्वत:चा विकास करण्याची संधी देऊ नका ! खामगांवच्या उज्वल भविष्याचे स्वप्न फक्त पंच वार्षिक निवडणूकीत दाखविणाऱ्या विरोधी उमेदवारांना त्यांनी यापूर्वी दिलेल्या खोट्या आश्वासनांची आठवण करून द्या ! २४ तास पाणी देण्याचा 'संकल्प' करणारे २४-२४ दिवस सुद्धा पाणी देऊ शकत नाहीत ही वस्तुस्थिती आहे व हे स्वविकास बहाद्दर तुमच्याकडे मत मागायला आल्यावर याची जाण त्यांना करून द्यायले विसरू नका. तुमच्या अमुल्य मतांद्वारे निवडून येऊन लोकप्रतिनिधी म्हणून जनतेची सेवा करण्याऐवजी ठेकेदारी करण्याकडे वाटचाल करून लाखो रूपयांची खळगी भरणाऱ्या या लोकप्रतिनीधींना मतदान करण्यापूर्वी रेल्वेगेट चा अपूर्ण अंडरपास, वर्षानुवर्षे काम सुरू असलेला घाटपूरीचा अपूर्ण रस्ता, पावसाळ्यात रस्त्यावरून वाहणाऱ्या कृत्रिम नद्या व डांसिंग रस्ते याविषयीचा जाब त्यांना विचारण्यास विसरू नका.

भ्रष्टाचार, अराजकता, मग्रुरी, हाच त्यांचा झालेला लेख। विकास धारेचं बळ नाही, खेळ मात्र रंगतो केवळ फेक।


# गुलजमा शहा यांच्या प्रभाग क्रमांक दोन मध्ये 76 कोटीचे विकास कामे पूर्ण !

## विकास का वादा ..आकाश दादा..!



खामगाव फास्ट : शहरातील विकासाच्या बाबतीत संपूर्णपणे पछाडलेला असलेला प्रभाग क्रमांक दोन आता खामगाव शहरात अव्वल नंबर वर आला आहे. गेल्या पंचवार्षिक मध्ये कामगार मंत्री ना. आकाश दादा फुंडकर यांच्या साथीने प्रभाग क्रमांक दोन मध्ये तब्बल 76 कोटी रुपयांची विकास कामे पूर्णत्वास केली आहे. हा विकासाचा उच्चांक साधण्यात आम्ही यशस्वी झालो असल्याची माहिती प्रभाग क्रमांक दोन चे नगरसेवक गुलजमा शहा यांनी दिली आहे. या विकास कामात सदैव साथ देणाऱ्या नामदार आकाश दादा फुंडकर यांचे सुद्धा त्यांनी शतशः आभार मानले आहेत. या प्रभागात रस्ते, नाल्या त्याचप्रमाणे शाळा, यांची दुरावस्था झाली होती नागरिकांसाठी स्मशानभूमीची व्यवस्था नव्हती. मुलांसाठी खेळण्याकरिता भव्य स्टेडियम, पिण्याच्या पाण्याचे सर्व नियोजनबद्ध आराखडा तयार करून त्यावर योग्यरित्या काम करून ही सर्व विकास कामे प्रामुख्याने पूर्ण केली. नगरपालिकेच्या माध्यमातून जनतेला देण्यात येणाऱ्या सर्व मूलभूत सुविधांचा अभाव असलेल्या आमच्या प्रभागात आता सर्वत्र मूलभूत समस्या निकाली निघाल्या आहेत

"न भूतो न भविष्यती" अशी करोडो ची विकास कामे करण्यात आले आहे . तर काही ठिकाणी सुरू असलेले काम जनतेच्या मनात एक घर करून गेले आहे नगरसेवक कसा असावा किती कामाचा असावा आणि किती काम प्रामाणिकपणे करणारा असावा याची प्रचिती आता जनतेच्या मनात रुंजी घालत आहे प्रभाग क्रमांक दोन मधील चकचकीत होणारे रस्ते आणि 90% दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करण्यास आम्ही आकाश दादांच्या मार्गदर्शनात समर्थपणे यशस्वी झालो याचीच ही प्रचिती आहे. आता 2025 मध्ये पुन्हा नगरपालिकेच्या निवडणुका लागल्या आहेत जनता भारतीय जनता पार्टीच्या सोबत सातत्याने विकासाभिमुख चेहरा म्हणून सदैव साथ राहणार आहे. जनतेचा आशीर्वाद हाच प्रामाणिकतेचा आणि केलेल्या कामाची पावती मिळणार आहे विकास कामात अजूनही कुठेही कुचराई राहणार नाही. जनतेने भरभरून आशीर्वाद दिल्यास पुन्हा एकदा विकासापासून कोसो दूर असलेल्या व सध्या विकासाच्या प्रवाहात अग्रस्थानावर असलेल्या प्रभागात कमळ फुलविण्यासाठी आम्ही सदैव सज्ज आहोत या सर्व बाबी करताना प्रभागातील सर्वसामान्य जनता कार्यकर्ता आणि महिला भगिनींनी जी समर्पणाची भावना आमच्या सोवत दाखवली त्या सर्वांचा आम्ही कायमस्वरूपी ऋणात राहू इच्छित आहे जनसेवेच्या माध्यमातून हे ऋण उतरवण्याचा आमचा प्रयत्न आहे. अशी प्रतिक्रिया अपक्ष उमेदवार गुलजमा शहा यांनी दिली आहे.



## प्रभाग क्रमांक दोन मधील मतदारांचा गुलजमा यांना भरगच्च प्रतिसाद

















# प्रभाग क्रमांक 03 मतदारांनी केल सुलोचना सिरसाट यांच्या विजया वर शिक्कामोर्तब

## मतदारांनो तुमच्या विश्वासाला तळा जाऊ देणार नाही : सुलोचना सिरसाट

**खामगाव :** खामगाव नगर पालिकेच्या निवडणुक मतदानाला अवघे काही तास शिल्लक राहिले आहेत त्यात प्रभाग क्रमांक 03 च्या वंचित बहुजन आघाडी च्या उमेदवार सुलोचना सिरसाट यांच्या विजया वर मतदारांनी शिक्कामोर्तब केले आहे सुलोचना सिरसाट यांच्या प्रचाराचा जोर पाहता विरोधकांनी ही नाग्या टाकल्या आहेत.

सर्व धर्म समभाव असलेल्या वंचित च्या उमेदवार मतदारांच्या मती आजच विजयी झाल्या आहेत प्रभाग 03 मध्ये विकासाचा अभाव पाहता मतदार यावेळी खऱ्या अर्थाने प्रभागाचा सर्वांगीण विकास करणाऱ्या आणि 24 तास मतदारांसाठी उपलब्ध असलेल्या डॉ सुरेश सिरसाट आणि त्यांच्या पत्नी सुलोचना सिरसाट यांनी सुरवातीपासूनच प्रचारात आघाडी घेतलेली आहे त्यामुळे ही निवडणूक त्यांच्या साठी अतिशय सोपी झाली आहे.

स्वतः मतदार ज्या वेळी निवडणूक हातात घेतात त्यावेळी उमेदवाराचा विजय हा निश्चित असतो असच काहीस प्रभाग 03 मध्ये झालाय सुलोचना सिरसाट यांची निवडणूक निशाणी ही गॅस सिलेंडर असून मतदार मात्र आपल्या मनातील उमेदवार सुलोचना सिरसाट ह्या विजयी होत आहेत त्याचा आनंद आजच साजरा करतांना दिसून येत आहे तरी मतदार बंधू आणि बघींनिंनो आपल्या प्रभागाचे प्रसिद्ध डॉ.सुरेश सिरसाट त्यांच्या पत्नी ज्या सर्व परिचित आहेत त्यांना मतदान करून भरघोस मतांनी वविजयी करा अस आवाहन ही करतांना मतदार दिसून येत आहेत सुलोचना सिरसाट यांचा विजय आजच शिक्कामोर्तब झालेला असला तरी स्वयंस्फूर्ती ने मतदानासाठी उद्या दिनांक 02 डिसेंबर ला बाहेर पडा आणि आपल्या मनातील हक्काचा उमेदवार सुलोचना सिरसाट यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करा असे प्रभाग 03 चे मतदार आवाहन करीत आहेत.



## प्रचाराचा मिळत असलेला प्रतिसाद पाहता विरोधकांनी चालू केला गलिच्छ प्रचार

## आनंद कीलोलीया व खासने ताई यांना मिळत आहे प्रचंड प्रतिसाद



**खामगाव :** होऊ घातलेल्या खामगाव नगरपालिका निवडणुकीला उणे पुरे चार दिवस शिल्लक असताना प्रचाराला गती आलेली आहे. प्रचाराकरिता ब्रह्मास्त्र स्वरूपात वापरण्यात येत असलेलं सोशल मीडियाचं माध्यम याचा क्रम सर्वप्रथम लागत असल्याचं दिसून येत आहे.

याच सोशल मीडियाच्या माध्यमातून प्रचार करीत असताना विरोधकांनी प्रभाग क्रमांक ११ मधील उमेदवार आनंद किलोलीया यांच्या विषयक सोशल मीडियाच्या माध्यमातून काहींना हाताशी धरून बदनामीकारक मजकूर प्रसिद्ध केला आहे. यावर प्रभाग क्रमांक ११ मधील उमेदवार राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) घड्याळ चिन्हवर आनंद किलोलिया है निवडणूक लढवीत आहे यांच्यासमोर एका माजी नगरसेवक सह इतरांसोबत लढत आहे सदर सोशल मीडियावरील बातमी संदर्भात आमच्या प्रतिनिधींनी संपर्क साधला असता त्या ठिकाणी आनंद कीलोलीया यांनी स्पष्ट भाषेत प्रतिक्रिया देत सांगितले की माझ्यावर नमुद असलेला गुन्हा हा न्यायप्रविष्ठ असल्याचे मी शपथपत्रांमध्ये लिहून दिले आहे.

शपथपत्राची सत्यता न पाहता विरोधी गटाने सोशल मीडियाचा वापर करीत गुन्हे संदर्भात पोस्ट प्रसिद्ध करीत दाखवून दिले आहे की आमच्या पायाची वाळू सरकली आहे आमच्या आपलेच दिवाळ झालं आहे असेच यांच्या कृत्यातून यातून प्रतीक होत आहे.

त्यामुळे सर्व प्रभागातील नागरिकांनी अशा कुठल्याच अफवा ला बळी न पडता आपण माझा सह सरस्वतीताई खासने यांना विजयी करावे असे प्रभाग क्रमांक ११ मधील उमेदवार आनंद कीलोलीया यांनी केले आहे.

## श्री संत गाडगे बाबा सेवा समिती व धोबी परिट समाजाचा सौ.अपर्णा फुंडकरांना जाहीर पाठींबा



**खामगाव :** खामगाव शहरात श्री संत गाडगे बाबा सेवा समिती व धोबी परिट समाज खामगांव शहर व तालुकाची बैठक आयोजित करण्यात आली. या वेळी खामगांव शहरात सुरु असलेल्या नगर पालिका निवडणुकी संदर्भात चर्चा करण्यात आली. यावेळी खामगांव शहरात भारतीय जनता पार्टीच्या उमेदवार सौ अपर्णा सागर फुंडकर तसेच भारतीय जनता पार्टी तर्फे निवडणुक लढवत असलेले नगर सेवक पदाचे सर्व उमेदवारांना जाहीर पाठींबा देण्याचा निर्णय घेण्यात आला.

या बैठकीत भारतीय जनता पार्टीचे श्री सागरदादा फुंडकर यांनी प्रत्यक्ष भेट देऊन धोबी परिट समाजाच्या विविध मागण्यांवर चर्चा करण्यात आली. यामध्ये सर्वात महत्वाची मागणी म्हणजे आपल्या समाजासाठी स्वतंत्र असे समाज भवन ही मागणी श्री सागरदादा फुंडकर यांनी मान्य केली आहे. धोबी परीट समाजासाठी भव्य असे सभागृह खामगांव शहरात लवकरच उभारण्यात येईल असेही त्यांनी यावेळी सांगितले. धोबी परिट समाजाच्या वतीने मा. ना.ॲड आकाशदादा फुंडकर यांच्या मार्गदर्शनात खामगांव शहरात व मतदार संघात सुरु असलेल्या विविध विकास कामांवर विश्वास ठेऊन सर्वानुमते खामगांव शहरात भारतीय जनता पार्टीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ अपर्णा सागर फुंडकर तसेच खामगांव शहरातील सर्व प्रभागात भारतीय जनता पार्टीचे निवडणुक लढवत असलेल्या उमेदवारांना जाहीर पाठींबा देण्याचे ठरले.

त्यानुसार खामगांव शहर व तालुका धोबी परिट समाजाच्या वतीने खामगांव शहरातील भारतीय जनता पार्टीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ अपर्णा फुंडकर तसेच शहरातील सर्व 17 प्रभागातील भारतीय जनता पार्टीच्या सर्व उमेदवारांना जाहीर पाठींबा देण्याचे जाहीर करण्यात येत आहे.